International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 8.141
Peer Reviewed Bi-Monthly
Vol. 6 No. 18 March - April - 2025

# 'मातीला पंख फुटताना : किशोरवयीन मुलींच्या समस्या एक चिंतन

**डॉ. विजय जाधव**
*राजस्थान महाविद्यालय, वाशीम*
*Corresponding Author – डॉ. विजय जाधव*
**DOI - 10.5281/zenodo.15240784**

इतर विषयांबरोबरच समाजजीवनाशी संबंधित विविधांगी पैलू ललित साहित्यातही ताकदीनिशी शब्दबद्ध होताना दिसताहेत. यात केवळ पुरुषच आघाडीवर आहेत असे अजिबात नाही. अतिशय प्रभावी असे लेखन स्त्रियादेखील करताहेत. त्यांच्याकडे दुय्यम दर्जाची स्त्री म्हणून नव्हे, तर एक सशक्त माणूस म्हणूनच बघायला हवे. त्यांनी त्यांचे मनुष्यत्व स्वकर्तृत्वाने वेळोवेळी सिद्ध केलेले आहे. शिक्षणाच्या अधिकाराचे त्यांनी अक्षरशः सोने केलेले आहे. अशी नावे संख्येने कमी असली तरी ती असामान्य अशीच आहेत. त्यामध्येच डॉ. पाटील यांचे नाव घ्यावे लागेल. त्या मिरवण्यासाठी नव्हे, तर सहेतुकपणे लेखन करतात. गंभीर अशा सामाजिक प्रश्नांना हात घालतात. त्यामुळे त्यांच्या लिखाणाकडे गंभीरपणे बघावे लागते.

डॉ. स्मिता पाटील लिखित 'मातीला पंख फुटताना' हे कुमारवयीन मुलीच्या ग्रामीण जीवनावर आधारित कादंबरी. दिलीपराज प्रकाशन, पुणे यांनी १ नोव्हेंबर २०२४ रोजी ही कादंबरी प्रकाशित केली. डॉ. स्मिता पाटील यांनी वैद्यकीय शिक्षण घेतले असून पाटील हॉस्पिटल, मेन रोड मोहोळ, जि. सोलापूर येथे त्या वैद्यकीय व्यवसाय करतात. आतापर्यंत त्यांची चार पुस्तके प्रसिद्ध झालेली आहेत. 'समिधा', 'नाही गिरवता येत कुठलीच लिपी' हे कविता संग्रह, 'गंमतगाणी' हा बालकवितासंग्रह तर 'शोध सुखाचा' हा ललित लेखसंग्रह प्रकाशित झालेला आहे. 'मातीला पंख फुटताना' ही त्यांची पहिलीच ग्रामीण जीवनावर आधारित कादंबरी. डॉ. स्मिता पाटील समाजशील व्यक्तिमत्व असून समाजातील विविध विषयांवर तसेच महिला जागृती अंतर्गत अनेक व्याख्याने त्यांनी दिलेली आहेत. त्यांच्या सामाजिक कार्यासाठी, साहित्य निर्मितीसाठी त्यांना अनेक पारितोषिके प्राप्न झालेली आहेत ही गौरवाची बाब आहे.

वैद्यकीय व्यवसायासोबतच, आपले कुटुंब सांभाळून त्यांनी केलेली साहित्यनिर्मिती ही वाखाणण्याजोगी आहे. तसे पाहता शिक्षक, प्राध्यापक हे अधिक प्रमाणात लेखनक्षेत्रामध्ये आपणास दिसतात; परंतु वैद्यकीय व्यवसायाशी संबंधित लेखिका अपवादानेच मिळतात. डॉ. स्मिता पाटील यांनी 'मातीला पंख फुटताना' या कादंबरीत ग्रामीण भागात शिक्षण घेणाऱ्या कुमारवयीन मुलीची व्यथा मांडलेली आहे. ग्रामीण भागात अजूनही शिक्षणाविषयी फारशी आस्था दिसत नाही. त्यातल्या त्यात शिक्षणासाठी पालक खूपच निरुत्साही असतात. मुलगी ही परक्याचे धन आहे, कितीही शिकवले तरीही आपला फायदा होणार नाही... कितीही शिकली तरी हुंडा द्यावाच लागतो या एकाच विचारातून ग्रामीण भागातील कितीतरी हुशार मुलींच्या जीवनाची राखरांगोळी झालेली आहे. गावात आजही मुलीचे लग्न ओझे वाटते आणि शिकत असलेली मुलगी कधी अब्रू घालवेल याची सतत पालकाच्या मनात भीती असल्याने लग्न करून मोकळे होणे हाच त्यांना उत्तम पर्याय वाटतो. आजही मोठ्या प्रमाणात अठरा वर्षांच्या

आतच मुलींची लग्ने खेड्यांमध्ये केली जातात... याउलट शहरांत अवस्था बदलत चालली आहे. शहरांत मुलांबरोबर मुलींनासुद्धा शिकवले जात आहे. त्यासुद्धा त्याच तत्परतेने शिक्षण घेत असून स्वतःच्या पायांवर उभ्या राहताहेत. आईवडीलसुद्धा त्यांच्यावर विश्वास करीत आहेत. ग्रामीण भागात मात्र आजही पूर्वावस्था कायम आहे. हजारो मुली चुकीच्या पद्धतीमुळे उद्ध्वस्त होताहेत. हे कुठेतरी थांबले पाहिजे. त्यांना शिकवले पाहिजे, अन्यथा, देशाला स्वातंत्र्य मिळून पंच्याहत्तर वर्षानंतर हीच अवस्था असेल तर त्या स्वातंत्र्याला काय अर्थ? याचसाठी डॉ. स्मिता पाटील यांची 'मातीला पंख फुटताना' ही कादंबरी आजच्या काळातील कुमारवयीन मुलीच्या जीवनासाठी अतिशय महत्त्वाची ठरणार आहे.

प्राथमिक शिक्षण पूर्ण करून माध्यमिक शाळेत शिक्षण घेणारी गौरी या कादंबरीची नायिका. तिची मोठी बहीण सुनीताचे सातवीपर्यंत शिक्षण घेतल्यानंतर लग्न करून दिले. तिला दोन मुले आहेत. ती शिकत असताना अतिशय हुशार होती. प्रत्येक वर्गात पहिली यायची; परंतु चांगले स्थळ मिळाले या सबबीखाली तिची फसवणूक झालेली. तिला मुलीच होत असल्याने तिची सासू तिलाच जबाबदार समजते आणि रोज छळते. नवरासुद्धा सासूचा ऐकतो... एकूणच, सुनीता म्हणजे गौरीची तायडे. रोज, मुलगी असल्याचे दुःख भोगत आहे; परंतु गौरीच्या पाठीशी ती खंबीरपणे उभी आहे. तिचे शिक्षण पूर्ण व्हावे म्हणून ती घरातल्यांशी वाद घालते.

गौरीचे आईवडील सामान्य शेतकरी. कधी कोरडा दुष्काळ, कधी ओल्या दुष्काळाशी दोन दोन हात करीत ते जगताहेत. याही अवस्थेत ते गौरीला आणि तिच्या लहान भावाला शिकवीत आहेत. तिचा काका मिल्ट्रीमध्ये होता. सेवानिवृत्तीनंतर तो गावी आला. त्याला पेन्शन सुरू आहे. तिच्या आई-वडिलांपेक्षा त्माची परिस्थिती खूपच बरी. त्याच्याकडे खेळता पैसा. कशाचीच कमतरता नाही. उलट तिच्या घरच्यांना त्याच्यापुढे हात पसरल्याशिवाय धकत नाही. काकाला ती नाना म्हणते. तिची काकू जुनाट विचारांची. मुलींची लग्मे लवकर करून द्यावीत यावर तिची पूर्णतः श्रद्धा. ती गौरीच्या लग्मासाठी सतत हेका लावत असते. तिची आजी पुरातन विचारांची समर्थक. मुलगा हा वंशाचा दिवा, तर मुली या वंशाचा सत्यानाश करणाऱ्या... ती अशा मताची. गौरीच्या आईला पहिल्या दोन मुलीच असल्यामुळे तिला खूप छळले, परंतु गौरीनंतर मुलगा झाल्याने तिच्या वागण्यात बदल होतो. मात्र, गौरीचे लग्न करून टाका या मतावर ती ठाम असून रोजच तिचे रहाटगाडगे चालू असते.

गौरीला सर्वात मोठा आधार तिच्या आईचा. गौरीच्या रूपाने तिच्या आईला तिची आई मिळाल्यागत वाटते. तिच्या आईची आई गौरीसारखीच सुंदर होती. तिचा जन्म होताच ती मरण पावली. तिच्या आईला सुख मिळाले नाही; परंतु ती गौरीला खूपच लाडात ठेवते. मात्र तिच्या सासूपुढे तिचे काहीच चालत नाही. तिचे आबा, अर्थात वडील हे खूप समजदार व्यक्ती असून कुटुंबावर प्रेम करणारे, परंतु परिस्थितीपुढे तेही हतबल होतात. आईसमोर, नानासमोर त्यांचे काही चालत नाही. मात्र गौरीवर त्यांचा खूप जीव असतो. गौरीच्या शिक्षणाची इच्छा पूर्ण व्हावी असे त्यांना वाटते. सातवीतून आठवीत गेल्यावर तिला पुस्तके वगैरे घेऊन देऊन शाळेत पाठवतात.

गौरीची जीवाभावाची मैत्रीण लक्ष्मी. ती तिची वर्गमैत्रीण असते, अभ्यासात पाहिजे तशी हुशार नसते. गौरीच्या रंगारूपालासुद्धा साजेशी नाही, परंतु सगळ्यात चांगली मैत्रीण आहे. त्यांच्या शाळेची सहल जाणार असते. गौरी आणि लक्ष्मी यापूर्वी कधीच शाळेच्या सहलीला गेलेल्या नसतात. यावेळेस त्या दोघींनी जाण्याचा बेत आखलेला असतो. घरी जाऊन ती आईला सांगते. कोकणात सहल चालली. मला जायचं म्हणजे जायचं असं म्हणते. आई म्हणते ठीक आहे. आबा आल्यावर तो होकार देतो. उद्या तालुक्याच्या ठिकाणी यार्डात कांदा विकायला घेऊन जाऊ, त्यातून आलेले पैसे सहलीसाठी देऊ, असे आबा म्हणतो. गौरीसुद्धा सहलीला नवीन ड्रेस आणि हिवाळ्याचे

दिवस असल्याने स्वेटर मावा म्हणून यार्डात जाण्यासाठी हट्ट धरते. आबा तयार होतो. काकू यार्डात जात नसतात म्हणून सांगते परंतु गौरी आबासोबत जाते. तिथे सर्व शेतकऱ्यांचे चेहरे पडलेले असतात. कर्नाटकातून कांदा विक्रीला आलेला असतो. आतापर्यंत वीस हजार रुपये क्विंटल भाव होता; परंतु आज फक्त दोनशे ते तीनशे रुपयांनी कांदा विकला जात होता. तो विकल्याशिवाय पर्याय नव्हता. आबा कांदा विकतो. खूप नाराज होतो. भाड्याचे पैसे निघत नाहीत. तरीही गौरीला ड्रेस आणि स्वेटर घेण्यासाठी नव्या पेठेत जाऊ म्हणून सांगतो. परंतु एकूण परिस्थिती बघितल्यावर गौरी कपडे घेत नाही आणि सहलीलासुद्धा जायचं नाही ठरवते. आबा खूप आग्रह करतो, परंतु बापाची अवस्था बघून कपडे घेत नाही आणि सहलीलासुद्धा जात नाही.

गौरीच्या आईचे जीवन खूपच दुःखातले. दोन वर्षांची असताना आई मरण पावलेली. बाप दुसरे लग्न करतो. सावत्रआई ही सावत्रआईची भूमिका खूप चोखपणे बजावते. गौरीच्या आईला खूप त्रास देते. सुनीता अर्थात तायडे हीचे लवकर लग्न झाल्यामुळे तिच्या जीवनाची वाईट अवस्था झालेली. गौरीची शांताक्का नवरा मरण पावल्यामुळे घरी आलेली. परंतु तिच्या आईसारखी तीसुद्धा गौरीला समजून घेते. स्त्रियांच्या दुःखाबद्दल सांगताना ती म्हणते,

**'लेकीचा गं जलम**
**देव देवूनी चुकला**
**बैल घाण्याला जुंपला**
**जन्मभरी.'**

आजही घाण्याला जुंपलेल्या बैलासारखी अवस्था स्त्रियांची आहे. कदाचित ही अवस्था दूर व्हावी यासाठीच लेखिकेने या कादंबरीतून जाणीवपूर्वक प्रयत्न केले असावेत.

कुमारवयीन मुलीच्या जीवनातील बारकावे डॉ. स्मिता पाटील यांनी सूक्ष्मपणे हेरण्याचे प्रयत्न कादंबरीच्या माध्यमातून केले आहेत. गौरी आठवीत असताना तिला पहिल्यांदा मासिक पाळी येते. ती घाबरते. शाळेतील पवार बाईकडे जाते. त्यावेळेस पवारबाईंने मासिक पाळीपासून स्त्री ही आई होईपर्यंतचा प्रवास फारच व्यवस्थितपणे समजावून सांगितला. अर्थात डॉ. स्मिता पाटील स्मृतः डॉक्टर असल्याने ती डॉक्टरचीच भूमिका आहे. ती प्रत्येक मुलीला माहीत व्हावी अशीच आहे. 'गौरी मुली मोठ्या झाल्या की त्यांना दर महिन्याला चार दिवस असा रक्तस्राव होतच असतो. यात काहीही घाबरण्यासारखे नाही. त्याला मासिक पाळी असे म्हटले जाते. मानवाचा वंश पुढे सुरू राहावा म्हणून स्त्रीला निसर्गाने ही मोलाची देणगी दिली आहे. दर महिन्याला स्त्रीच्या शरीरात गर्भाशयमुखाच्या दोन्ही बाजूला असणाऱ्या स्त्रीबीज कोशातून एक स्त्रीबीज परिपक्व होऊन कोषाबाहेर पडत असते. हे बीज गर्भाशयनलिकेत जाते. तिथे पुरुषबिजाची वाट पाहते. बीज मिळाले तर त्या दोन्हींचे एक संयुक्त बीज तयार होते.. हे संयुक्त बीज गर्भाशयात जाऊन रुजते. त्यातूनच पुढे गर्भ तयार होतो. या संयुक्त बीजाला रुजवण्यासाठी गर्भाशयाने पूर्ण तयारी केलेली असते. गर्भाशयातील अस्त्रे वाढलेली असतात. रक्तप्रवाह वाढलेला असतो. ज्यावेळी स्त्रीबीजाला पुरुषबीज मिळत नाही, त्यावेळी गर्भाशय गर्भ रुजवण्यासाठी केलेली तयारी मोडून टाकते. त्यातील अधिकचा रक्तस्राव योनीद्वारे बाहेर टाकते, यालाच मासिक पाळी म्हटले जाते. यामध्ये अपवित्र, अमंगल असे काहीही नसते. हे अगदी नॉर्मल असते. तू आता घरी जा. आईला सांग, तुझे कपडे वगैरे बदल.'

उन्हाळ्याच्या सुट्ट्या लागतात. गौरी आठवी पास होते. सगळ्यांना आनंद होतो. आठवी झाली, आता लग्न करून टाका असे आजी घरच्यांना सांगते. उन्हाळ्यात आबाचे वर्गमित्र कोल्हापूरचे माधवकाका यांच्याकडे जातात. आबा मध्येच शाळा सोडतात. माधवकाका घरची अवस्था नीट नसताना इंजिनिअरिंगपर्यंतचे शिक्षण घेऊन अभियंतापदावर कार्यरत असतात. त्यांच्याकडे जाऊन येतात.

शिक्षणामुळे माणसाच्या जीवनात कसा बदल होतो, काकांच्या जीवनावरून गौरी विचार करते.

गौरी आठवी पास होऊन नववीच्या वर्गात प्रवेश घेते. लक्ष्मीसोबत नियमित शाळेमध्ये जाते. एक दिवस तिच्या शाळेमध्ये किशोरी मेळावा होतो. मार्गदर्शन करण्यासाठी शिक्षणतज्ज्ञ, डॉक्टर, वकील अशा अनेक कर्तृत्ववान महिला बोलवण्यात येतात. डॉक्टर मॅडमने सावित्रीबाईंनी शिक्षणासाठी केलेल्या कार्याची माहिती दिली. त्याचबरोबर पाकिस्तान मधील मलाला युसुफजाईची गोष्ट सांगितली. पाकिस्तानमधल्या स्वांत खोर्यात ती व तिचे कुटुंब राहत होते. तालिबानी अतिरेक्यांनी हैदोस मांडला होता. 'मुलींनी शाळेत जाऊ नये, घराबाहेर पडू नये, दूरदर्शन बघू नये, नृत्यसंगीत ऐकू नये, खरेदीसाठी मार्केटला जाऊ नये असे अनेक फतवे काढले होते. फक्त पाचवीत शिकणाऱ्या मलालाने जगाला माहिती दिली. रेडिओवर आणि लेखणीच्या माध्यमातून माहिती सांगितली. मलालाला प्रचंड प्रसिद्धी मिळाली. तालिबानी अतिरेक्यांनी स्वांत खोरे सोडून जाण्यासाठी सांगितले, पण त्यांनी ऐकले नाही. एक दिवस मलालाच्या शाळेच्या बसमध्ये अतिरेकी घुसले. तिच्यावर गोळ्या झाडल्या. तिच्यावर प्रथमतः पाकिस्तानमध्ये, नंतर इंग्लंडमध्ये उपचार करण्यात आले. ती वाचली. पुढेसुद्धा तिने मुलींच्या शिक्षणासंदर्भात जागृती चालू ठेवली. गौरीला मलालाची कथा खूप आवडली. आपणसुद्धा काही झालं तरी शिक्षण सोडायचे नाही अशी ती ठरविते.

नववीत शिकत असताना पुढे काही दिवसांनी लक्ष्मीचे लग्मु होते. गौरीला खूप वेदना होतात; परंतु ती काहीच करू शकत नाही. आता ती एकटीच शाळेत जात होती. लक्ष्मीच्या लग्मानंतर आजी गौरीच्या लग्मासाठी खूपच टोमणा मारत असते. तेवढ्यात नानांनी सांगलीला मुलाचे स्थळ चालून आल्याचे सांगितले. एकुलता एक मुलगा... घर, जमीन, नोकरी सर्वकाही आहे. पाहुण्याला बोलावून गौरीला दाखवू असे त्यांचे म्हणणे असते. पाहता पाहता नववीची परीक्षा होते. निकाल लागतो. गौरी वर्गात पहिली येते. तायडी पाहुणी म्हणून घरी येते. तिला पहिल्याच दोन मुली आणि तिसऱ्यांदा दिवस गेलेले. जून महिना सुरू होतो. गौरीची दहावीची शाळा सुरू होते. ती अतिशय मन लावून अभ्यास करते. खूप दिवसांनंतर लक्ष्मी गावाला येते. पूर्णतः वाळून गेलेली. चेहर्याचे सौंदर्य, तेज सगळे निघून गेलेले. नवरा दारुड्या निघतो. सासूचा ऐकून तो कोणत्याही कारणावरून तिला खूप मारहाण करतो. हे सर्व ऐकून गौरीला खूप वाईट वाटते. काही झालं तरी आपण शिकावे, मोठ्या पदावर जावे, मगच लग्म करावे असे तिला वाटायला लागते.

गौरी रोज रस्त्याने एकटी शाळेत जात असते. शिरप्पा तेव्हा आडवा येतो. टिंगलटवाळी करतो. ती खूप घाबरते. हा प्रकार कानांवर पडताच तायडी म्हणते, 'यानंतर शिरप्पानं अडवलं तर मुख्याध्यापक सरांना सांग. काही दिवसांनी गौरीला एकटीला पाहून शिरप्पा पुन्हा तिला अडवून तो तिला सरळ लग्माची मागणी घालतो. सहन न झाल्याने ती सरळ मुख्याध्यापकाला जाऊन सांगते. मुख्याध्यापक रस्ट्रीकेट करण्याची धमकी देतो. त्यानंतर तो सरळ होतो.

तायडेची अर्थात सुनीताची मैत्रीण अर्चना अचानक घरी येते. ती चारचाकीमधून उतरते. ती खूपच सुंदर दिसत असते. तिच्या अंगावर खूप चांगले कपडे. तिची मुलगी परीसारखी सुंदर दिसते. अर्चना आणि सुनीता सातवीपर्यंत एकाच वर्गात शिकत होत्या. तिचे वडील शिक्षक. सातवीनंतर त्यांनी तालुक्याच्या ठिकाणी बदली करून घेतली. पुढे अर्चना इंजीनियरिंगचे शिक्षण घेते. एका कंपनीत नोकरीला लागते. त्याच कंपनीतील नोकरी करणाऱ्या इंजिनियर मुलाशी लग्म करते. पुण्याला सेटल होते. आता ती खूप सुखात आहे. सुनिताची शाळा सातवीत बंद होते आणि आता ती रोजच नरकयातना भोगत आहे. गौरीला वाटते, काही झालं तरी आपण शिकायचं. आपली घरची परिस्थिती बदलायची.

दहावीत शिकत असताना नाना अचानक गौरीसाठी मुलगा बघायला आणतो. गौरी खूप रडते.

शेवटी, तोंडाला काळे लावल्यागत मेकअप करते. मुलाने पसंत करू नये म्हणून असे केले जाते. या कामात तायडे सोबत असते. दहावीची परीक्षा होईपर्यंत मुलाचा निरोप येत नाही. गौरी शाळेत जाऊन पवारबाईला सर्वकाही सांगते. पवारबाई मुख्याध्यापकाला गौरीला शिकवा, ती खूप हुशार आहे, तिचे लग्न करू नका असे घरी जाऊन सांगायला लावते; परंतु याचा काहीच फायदा होत नाही. आजी आणि नाना काहीच ऐकून घेत नाहीत. मुलाचा निरोप न आल्याने गौरी शाळेत जात होती. तेवढ्यात पुण्याहून अनुप्रिती मॅडम शाळेत आल्या होत्या. 'दहावीनंतर करिअर' या विषयावर तिचे व्याख्यान ठेवले होते. मॅडमने खूप प्रेरणादायी व्याख्यान दिले. पुण्याला त्या स्मृतः अनाथ मुलांसाठी आश्रम चालवीत होत्या. मुलांना, भविष्यात तुम्हाला काय अडचण आली तर माझ्याकडे या. त्यांनी पत्ता आणि फोन नंबर दिला होता त्यांचे भाषण ऐकून गौरीला फार बरे वाटले होते.

दहावीची परीक्षा सुरू होते. गौरीचे सर्व पेपर खूप चांगले जातात. त्यानंतर सांगलीच्या मुलाचा होकार येतो. पंधरा दिवसांनी सुपारी फोडायला येणार असतात. त्यांनी हुंडा पाहिजे नाही, फक्त पोरगी आणि नारळ द्या असा निरोप पाठविल्याने गौरी लग्न पक्के होणार म्हणून खूप घाबरते. तिच्या सर्व स्वप्नांवर पाणी फिरणार होते. ती सतत तणावात राहते. तिने खाणेपिणे सोडले. आता आपल्याला जगायचे नाही या विचारावर ती ठाम झालेली. घरातील सर्वांचाच तिला राग येत होता. आत्महत्मा करायची म्हणून ती दोन दिवसांपासून घरात फवारणीचे औषध शोधत होती. शेवटी एका पुडीत उंदीर मारायचे औषध सापडते. ती कंपासमध्ये आणून ठेवते. रात्री सर्व झोपल्यावर ती सर्वप्रथम झोपलेल्या आईपाशी जाते. माफी मागते. नंतर बापापाशी, भावापाशी, आजीपाशी, नानापाशी, काकूपाशी.... नंतर तायडेजवळ जाते. सर्वांची रडत रडत मनातल्या मनात माफी मागते. सर्वांच्या पायांना हात लावते. उद्या मी तुम्हाला दिसणार नाही... ती खूप रडते. तेवढ्यात तायडे झोपेतून उठते. गौरीचा प्रकार पाहून खूप रागावते. आत्महत्या करणे मार्ग नाही, तुला लग्न करायचे नाही ना, नको करू. तुला अडीअडचणीला पाहिजे म्हणून लपवून ठेवलेले दहा हजार रुपये देते. ते घे आणि पुण्याला पळून जा. तिथे अनु प्रीतीमॅडमच्या आश्रमावर जा. तिला सर्व प्रकार सांग. काही ना काही मार्ग निघेल. दोघी ठरवतात. सकाळी पाच वाजता गौरी सर्व आवरते. साडेपाच वाजता तोंडाला रुमाल बांधते. पाठीवर बॅग घेते. तायडीचा निरोप घेते. बसस्टँडवर पोहोचते. गाडीत बसून पुण्याला पोहोचते. रिक्षा पकडून आश्रमात जाते. एका तासानंतर मॅडमची भेट होते. मॅडम रागावते. असे पळून येणे बरोबर नाही. मला फोन का केला नाही म्हणून विचारते.

तोपर्यंत इकडे घरी सगळ्यांचे रडणेपडणे सुरू होते. गौरीने आत्महत्या केली असावी म्हणून सर्वत्र शोधाशोध सुरू होते. आई खूप रडते. आबा रडतात. सर्वजण तायडेला विचारतात, ती ठामपणे माहीत नसल्याचे सांगते. तेवढ्यात आजीने, कोणाचातरी हात धरून गेली असेल असे म्हणताच सर्वच तिच्यावर ओरडतात. गौरी असे करू शकत नाही. तिला खूप शिकायचे होते. लग्न लावून देत असल्यामुळे तिने काहीतरी गडबड केली असावी असे वाटते.

मॅडम पुण्यावरून गौरीला घेऊन घरी येते. सर्वांना समजावून सांगते. गौरी आईच्या गळ्यात पडून रडते. मॅडम घरच्यांना समजावते. शिक्षण मुलांचा अधिकार आहे. अठरा वर्षांआधी लग्न करणे हे कायद्याने गुन्हा आहे. दुर्दैवाने गौरी माझ्याजवळ आली म्हणून ठीक, नाहीतर काहीही झाले असते. घरचे सर्व लोक माफी मागतात. आता तिला आम्ही कितीही शिकवू असे म्हणून आबा माफी मागतो.

पुढे जून महिन्यात गौरीने तालुक्याच्या ठिकाणी अकरावीत प्रवेश घेतला. तिच्या आनंदाला पारावार उरत नव्हता. पिसारा फुलवून जणू ती काळीजभर नाचत होती.

एकूणच, 'मातीला पंख फुटताना' या कादंबरीत डॉ. स्मिता पाटील यांनी कुमारवयीन ग्रामीण

भागातील मुलींच्या प्रश्नांना वाचा फोडली असून प्रत्येक गावात कितीतरी कुमारवयीन मुलींची लवकर लग्मे करून त्यांची आयुष्ये उध्वस्त करीत आहेत. एकीकडे आपण चंद्र सूर्यावर जात आहोत. भारत महासत्ताक होत आहे, तर दुसरीकडे ग्रामीण भागातील मुली आजही याच अवस्थेत जीवन जगत आहेत. जागृती होणे खूप गरजेचे आहे. मुलांमुलींमध्ये आजही मोठ्या प्रमाणात फरक करताना लोक दिसत आहेत. जुनी मानसिकता अद्याप बदललेली नाही. आजही मुलगी म्हणजे ओझे वाटत आहे; परंतु त्यांच्या शिक्षणाचे दरवाजे उघडा, तिला शिकू द्या, नक्की चित्र बदलेल ही भावना कादंबरीच्या प्रत्येक पानामध्ये डॉ.पाटील यांनी मांडण्याचा प्रयत्न केला आहे.

भारतीय समाजव्यवस्थेत स्त्री ही दुय्यमस्थानीच नव्हे, तर ती गुलामीच्या शृंखलेत ढकलली गेली. ती अधिकारवंचित ठेवली गेली. वर्षानुवर्षे ती अन्याय, अत्याचार सोसत आलेली. माणूस म्हणून तिचे नैसर्गिक हक्क व्यवस्थेने स्मशानात पोहोचविले होते. पण भारतीय संविधानाने त्यांना माणूस असल्याची जाणीव करून दिली, त्यांना माणसांत आणले आणि त्यांचे अधिकार त्यांना सुपूर्द केले. त्यांना शिक्षण घेता यायला लागले. याचा परिणाम, ती सक्षम होत गेली. तरीही तिचे थिटेपण पूर्णार्थाने आजही संपुष्टात आलेले नाही. ते यायचे असेल तर एकच उपाय आहे शिक्षण. हाच मुद्दा प्रमुख बनवून या कादंबरीला डॉ. पाटील यांनी अधिक उंचीवर घेऊन जाण्याचा स्मुत्म असा प्रयत्म केलेला आहे.

या स्त्रीप्रधान कादंबरीमधून डॉ. पाटील यांनी केवळ समस्येचे वर्णनच केले नाही, तर मार्गसुद्धा सांगितलेला आहे. कादंबरीचे कथानक सरळसोट असून वाचताना जिज्ञासा निर्माण होते. कथानकाची सुरुवात आकर्षक असून वाचकमनामध्ये आवड निर्माण करणारी आहे. शेवट अस्वस्थ करणारा. कादंबरीचे निवेदन प्रथमपुरुषी असून घटना, प्रसंगांना धरून आहे. यातील निवेदन घटना, प्रसंगांना, पात्रांना न्माय देणारे आहे. कथानकातील व्यक्तिचित्रणे वास्तववादी असून ती विषयाला धरून आलेली आहेत. एकूनच वातावरण कथानकाला जिवंत करते, तसेच संघर्षाला पूरक ठरताना दिसते. लेखिकेची निवेदनशैली प्रमाणभाषेतून असून पाहिजे तिथे बोलीभाषेचा वापर झालेला आहे. भाषाशैली सहज, सुंदर, स्वाभाविक असून पात्रे आपल्या योग्झतेनुसार भाषा वापरताना दिसतात.

एकूणच, कादंबरी कथानक, पात्रे, संवाद, संघर्ष, भाषाशैली या सर्वच बाबतीत व्यवस्थित असून मराठी साहित्यात प्रस्तुत कादंबरी वाचकप्रिय ठरेल यात शंका वाटत नाही.